# प्रकरण तिसरे

## गांधारीचे डोळे " या कादंबरीचे स्वरूप

## आणि मूल्यमापन

## प्रकरण तिसरे

## "गांधारीचे डोळे" या कादंबरीचे स्वरूप आणि मूल्यमापन

### प्रस्तावना :

मागील प्रकरणामध्ये " उलट चालिला प्रवाहो " या कादंबरीचा अभ्यास केला. प्रस्तुत प्रकरणामध्ये " गांधारीचे डोळे " या कादंबरीचा अभ्यास करावयाचा आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात मताधिकार, विकास योजना, संविधानाचे धर्मनिरपेक्ष लोकतंत्री स्वरूप इत्यादींमुळे राजकीय जागृती झाली. विविध संघटना निर्माण झाल्या. त्यातून हितसंबंध निर्माण झाले. स्वार्थी वृत्ती वाढीस लागल्या. ग्रामीण शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली राजकीय जागृती आणि दिवसेंदिवस वाढणाऱ्या राजकीय क्रिया प्रतिक्रिया ही आजच्या राजकीय जीवनाची महत्त्वपूर्ण वैशिष्टये आहेत. या प्रकारच्या राजकीय क्रिया-प्रतिक्रिया या कादंबरीत चित्रित झालेल्या दिसून येतात.

निवडणुकीमुळे ग्रामजीवन ढवळून निघालेले दिसते. राजकारणाचा एक वेगळा पैलू म्हणजे निवडणुका होय. नवीन घटनेने या देशातील सर्वांना मतदानाचा अधिकार दिला. भारतीय लोकजीवनाच्या दीर्घ इतिहासात ही अभूतपूर्व घटना होती. प्रौढ मताधिकारामुळे गावातील

लोक जागृत झाले. निवडणुकीमुळे प्रचार डावपेच निर्माण झाले. लोक घराघरांतून फिरू लागले. बिडीकाडी, पानसुपारी यावर अमाप खर्च होऊ लागला. राजकारणामुळे घराघरांतील सामूहिकता व्यावहारिक स्तरावर खंडीत झालेली दिसते. पक्षकार्य व पक्षस्वार्थ हे व्यक्तींना जोडण्याचा प्रयत्न करतात. तर हीच पक्षप्रवृत्ती, भेदभाव व वैरही निर्माण करते. जातीयता, भाषा, प्रांतीयता इत्यादी पारंपरिक मर्यादांनी विभागलेला शिक्षित समुदाय राजकारणाने एकत्र आला. श्रीमंत, जमीनदार आपल्या हातून निघून गेलेल्या सत्तेसाठी राजकीय पक्षाशी हातमिळवणी करताना दिसू लागले. स्वातंत्र्यानंतर अनेक बदल घडले. पण ग्रामीण भागामध्ये जे परिवर्तन घडायला हवे होते ते घडलेले दिसत नाही. येथे सौंदर्य हा शाप ठरतो. सज्जनपणा हा दुबळेपणा ठरतो. सरळ मार्गाने जाणा-याला सरळपणे जगू दिले जात नाही.

" गांधारीचे डोळे " या कादंबरीचे कथानक :

नारायण कल्लोळी नानासाहेबांच्या सेवाभावी संघटनेमध्ये काम करत असतो. नारायणची आई त्याला सांगायची की आपण भलं, आपलं काम भलं असं माणसान राहावं. नोकरी करावी, लग्न करून संसार करावा. आपण गरीब माणसं, काय करायच्यात दुस-याच्या भानगडी. आईने सांगितलेले हे विचार मनात आठवत नारायण निघालेला आहे. तेवढ्यात त्याला रस्त्याच्या कडेला अंधूक प्रकाशात अस्ताव्यस्त पसरलेली एक स्त्री दिसली. हिरवी गर्द साडी, पांढरा शुभ्र परकर, लाल ब्लाऊज हे सर्व पाहिल्यावर एखादा आक्रोश वातावरणात पसरावा, असे दृश्य पाहण्याचा त्याचा पहिलाच प्रसंग होता.

" जनमत " च्या कार्यालयात जाऊन नारायणने पाहिलेला प्रसंग आबासाहेबांना सांगितला. ते दृश्य पाहिल्यावर आबासाहेब नारायणला म्हणाले, " तूच नीट बघ रक्ताची धार दिसते ती धार नसून लांब लाल रिबीन आहे " ते म्हणतात, 'हा चमेली आहे. खूप प्यालाय मादरचोद, आजकाल फार पितोय अन् ल्हास होऊन पडतोय चला." हे ऐकून नारायण त्यांना काहीच बोलत नाही. तो संघटनेतील मुलं वाट पाहत असतील म्हणून निघून जातो.

राघवेंद्रने " रक्ताच्या थारोळ्यात तरुणीचे प्रेत या शीर्षकाखाली तो सर्व प्रकार विनोदी शैलीत लिहून " जनमत " या अंकात छापला. दुस-या दिवशी पेपर विकणारा शिंदे म्हणू लागला की, " रक्ताच्या थारोळ्यात तरुणीच प्रेत, वाचा: " जनमत " च्या अंकामध्ये खास बातमी नसली तरी अंक खपण्यासाठी शिंदेला मोठ्याने सांगायची सवय होती, हे लोकांना माहीत होते तरीही लोकांनी अंक घेऊन बातमी वाचली. चौकटीमध्ये नारायणबद्दलही लिहिले होते, " हिजड्यांना घाबरणारा हा माणूस जीवनात काय करू शकणार आहे ? याला नेहमीच " दृष्टिभ्रम " होत असतात." नारायण निधी जमा करायचा. लोकांना तंग करायचा. म्हणून ही बातमी वाचल्यावर लोकांना त्याचा राग आला.

" जनमत " च्याअंकामध्ये काहीही छापून आले तरीही नारायणच्या डोळ्या समोरून चमेली हटत नव्हता. चमेली कुठे राहत असेल ? त्याचे आई-वडील, नातेवाईक कुठे असतील ? तो असा बेहोष होऊन का पडला असेल ? त्याला एवढे दु:ख कसले झाले असेल ? हे प्रश्न नारायणच्या मनात आले. चमेलीसारख्या लोकांचा समाजाने का तिरस्कार करावा ? त्याचा काय अपराध ? तो अपराध निसर्गाचा आहे. यासारख्या असंख्य प्रश्नांच्या चक्रव्यूहात अडकून पडलेल्या अभिमन्यूसारखी नारायणची अवस्था झाली आहे. नारायण अठ्ठावीस वर्षांच्या आयुष्यात कधी अस्वस्थ झाला नाही. पण चमेली बेहोष झालेला आहे हे पाहून तो अस्वस्थ होतो.

नारायणच्या घरी तीन माणसे होती. त्याच्या आई-वडिलांना वाटायचे की एकत्र जेवायला बसावे, त्याला भरवावं, त्याची काळजी घ्यावी, पण त्याचं सर्व तंत्रच निराळं आहे. म्हाता-या आई-वडिलांना उगीच त्रास कशाला दयायचा म्हणून नारायणला शेवटी एकटे बसायला व हाताने वाढून घेऊन जेवायला आवडायचे. एकदा कंटाळून आई त्याला म्हणाली, " आम्हाला आणलंस कशाला इथं ? आम्ही खेडयात होतो तेच बरे. अरे, मी थकले आहे. उठत बसत कसातरी स्वयंपाक करते. तू लग्न कर, किती दिवस झाले. तुझ्या बरोबरच्या पोरांना दोन दोन लेकर झाली अन् तू तसाच. मला म्हातारीलाही तुझ्या तंत्राप्रमाणे वागणं जमत नाही. तुझी बायको आली की ती सांभाळेल तुझी सारी तंत्रे..." असे म्हणून आई बिचारी रडत असे.

बायकोचा मृत्यू झाल्यानंतर शिंदे सव्वावर्षाच्या मुलाला सायकलवर घेऊन पेपर विकत होता. पहिल्यासारखा त्यांच्या आवाजात आता खणखणीतपणा राहिला नव्हता. राघवेंद्रला आबासाहेबांचे न झालेले भाषण तयार करावे लागायचे-त्या भाषणामध्ये समाजाला उपदेश केलेला असे. शासनाची धोरण समजावून सांगितलेली असत. देशाच्या स्वातंत्र्यलढयाची आठवण करून दिलेली असे. न केलेल्या पराक्रमाची वर्णने असत. इकडे सामान्य कार्यकर्त्यांमधून एका समर्थ नेतृत्वाचा उदय होत होता. या बातम्या पेपरमध्ये वाचून लोक त्याची चर्चा करु लागले. तरीही आबासाहेब नारायणच्या घरी गेले व त्याला म्हणाले, "नारायणराव काय विचार आहे मग ?....चालू दया हो तुमचं सामाजिक काम. त्याला कोण नको म्हणतंय की काय ? आधी लग्न उरकून घ्या.... अन् करा की रग्गड सामाजिक काम....आम्हीही मदतीला येऊ तुमच्या" हे त्यांचे बोलणे नारायणला पटले नाही. घरी आलेल्या माणसांचा अपमान करु नये एवढा सुसंस्कृतपणा नारायणजवळ होता. लंब्या-चौड्या बाता मारणारे आबासाहेब गोड बोलून स्वत:चा स्वार्थ साधत होते हे नारायणला माहीत आहे.

गावातील एका माणसाने शाळेतल्या एका शिक्षकाला शाळेच्या आवारात खून मारले. आबासाहेब हा एक प्रतिष्ठीत माणूस आहे. म्हणून लोक त्यांच्याकडे न्याय मागायला गेले त्यानी न्याय दिला नाही ते त्या मरणा-या माणसाला बोलले नाहीत. उलट त्या शिक्षकाला म्हणाले, अशी प्रकरणे वाढू देऊ नयेत. गावच्या अब्रूचा प्रश्न आहे. त्याला पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवू देत नाहीत. नारायणाला वाटत होते की गुन्हेगाराला शासन झाले पाहिजे पण आबासाहेब नारायणाला म्हणाले, " जाऊ दे नारायण, तो माणूसच बदमाश आहे, समाज आपल्या दहा हातांनी चांगले करीत असतो. असा एखादा दुसरा असणारच" हे ऐकूण नारायण त्यांना म्हणाला, " शिक्षकाच्या प्रतिष्ठेचे काय ! शिस्तीचे काय !" शेवटी त्याने मोर्चा पोलीस स्टेशनकडे नेला. परंतु त्या शिक्षकाने त्याला तक्रार नोंदवू दिली नाही.

जिल्हयाच्या ठिकाणी शिकणारी कुसुम दिवाळीच्या सुट्टीत गावी आली ती व तिच्याबरोबरच्या मुली संघटनेच्या कार्यालयात येऊन स्त्रियांच्या विषयावर चर्चा करू लागल्या. कुसुम धीट आहे. तिच्या अनेक तरूणांशी ओळखी आहेत. मुलगी मोठी झाली आहे. जिल्हयाच्या ठिकाणी शिकते. समजंस आहे, तरीही हे सर्व तिच्या आई-वडिलांना मान्य नाही. संघटनेच्या कार्यालयात बसल्यावर नारायणानेतिची चौकशी केली. तिला रंगनाथ व त्याच्या बायकोचे भांडण का लागते याची चौकशी करायला सांगितले. कुसुम रंगनाथ न्हाव्याच्या घरी गेली. कॉलेजमध्ये घडलेल्या गंमती रंगनाथच्या बायकोला सांगून तिला खूष केले व चौकशी करून आल्यावर नारायणाला सर्व सांगितले. तिला एक बाब खटकली. ती म्हणजे नारायण बद्दल " जनमत " मध्ये काहीही छापले होते, " युवक नेत्याचे चाळे ! वाचाच, ब्रम्हज्ञान अन् आपण सगळी घाण" या बातमीत युवक नेत्याचे नाव नव्हते, त्याच्या सवयी छापल्या होत्या. याची कारणे स्पष्ट होती. आबासाहेब निवडणुकीला उभे राहणार होते म्हणून त्यांनी विरोधकांचे खच्चीकरण सुरू केले होते. आबासाहेब सामान्य कार्यकर्ते म्हणून वावरले होते. त्यांनी नि:स्वार्थी कार्यकर्ता म्हणून स्वत:ची प्रतिमा निर्माण केली होती.

याचा अर्थ नारायणासारख्या मुलांना माहिती आहे. त्या मुलांचाच आबासाहेबांना खरा धाक वाटत होता.

सेवाभावी संघटनेचे नानासाहेब आता थकले होते. रावसाहेब माने घाणेरडं राजकारण करून संघटनेचे सेक्रेटरी झाले, तेव्हापासून संघटना खिळखिळी झाली होती. संघटनेने एखादा प्रश्न मांडला तर त्याची दखल कोणी घेत नाही म्हणून नारायण व संघटनेच्या कार्यकर्त्यांनी राजकारणात भाग घेतला. असाच एकदा नारायण चमेलीच्या घरी गेला. नारायण आपल्या घरी आलेला आहे हे पाहून चमेली एकदम चकितच झाला. चमेलीच्या घरात दोन-तीन हिजडे झोपले होते. हिजड्याच्या भडक साड्या, अंगाला चिटकून बसलेले ब्लाऊज, घोटून केलेली दाढी हे पाहिल्यावर त्याला किळस आली. त्याला आपण इथं कशासाठी आलो हेच कळले नाही. नारायण चमेलीला म्हणाला, " रंगनाथचा सारा संसार उधळलास तर ! " तेव्हा चमेली त्याला म्हणाला, "अहो, कोणी कुणाचा संसार उधळत नाही. आपआपल्या कर्मांची, वासनांची फळं माणसं भोगत असतात." चमेली पुढे म्हणतो आम्हाला उत्पन्नाचे साधन नाही. कुणी कामावर ठेवत नाही. मनात असो व नसो आम्हाला सर्व करावे लागते."

चमेलीची कहाणी करुण आहे. चमेली चवथी-पाचवी शिकलेला आहे. त्याला ऑफिसमध्ये चपराशाची नोकरी असते. चमेलीच्या आई-वडीलांनी त्याचे लग्न केले. सून घरी आली पण तिला मूल होत नाही. कारण चमेलीमध्ये दोष होता. डॉक्टर, मांत्रिक नवस-सायास, साधू, संन्याशी, गंडेदोरे, देवदेवर्षीही केले, त्याला कुठलाच देव पावला नाही. चमेलीचे पौरुषत्व गेले. त्याचा आवाज बदलला. त्याची बायको त्याचा अपमान करु लागली. त्यामुळे चमेलीला घरातील आपले अस्तित्व संपले आहे असे वाटू लागले.

याच काळात चमेलीला न्यायला काही लोक आले. ते त्याला म्हणाले, " ये चल निघून ये. इथे तू आता निरुपयोगी झालास. तुझी बायको तुला बरं बघत नाही . ये आमच्यात मिसळ. यातच सुख

आहे. इथले लोक तुला कावळ्यासारखे टोचून जखमी करतील. त्या जखमा सडत जावून किडे पडतील, असे सडत मरण्यापेक्षा सुखाने मर." चमेलीलाही वाटले की सुख याच्यात आहे. ते म्हणाले," अरे, ये घाबरु नकोस तू आमचाच आहेस....तू नाही आलास तर आम्ही तुला ओढून नेऊ" हे ऐकून तो त्यांच्या मेळयात गेला. त्या लोकांनी त्याला स्त्रियांचे कपडे घालायला दिले. गुरुमाऊलीने कानात मंत्र फुंकला, त्याचे कान टोचले, दुस-या दिवशी त्याचा विधी केला. चमनराव हे नाव बदलून चमेली ठेवले व मिठाई वाटली. चमेलीचे दु:ख ऐकूण नारायणाला खूप वाईट वाटले.

निवडणुकीला सुरुवात झाल्यावर गल्लीपासून दिल्लीपर्यंत चर्चा सुरु होते. राघवेंद्र सर्व श्रेय पणाला लावून आबासाहेबांचे वेगवेगळया पोजेसमधले फोटो, त्यांनी केलेली खरीखोटी विधाने, कार्याचे वर्णन या सर्व बातम्या छापत होता. ठिकठिकाणी नारायण कल्लोळी निर्माण झाले तर आपला देश उजळून निघायला वेळ लागणार नाही असेही छापून राघवेंद्रने त्याचे अभिनंदन केले होते. ही बातमी सरळ असली तरी त्यातून वेगवेगळे अर्थ निघत होते.

सत्ताधारी पक्ष अडी-नडीचे प्रश्न सोडवतो म्हणून लोकांचा ओढा त्या पक्षाकडे आहे. बामणीचे देशमुख तालुक्यातील सर्वात मोठे प्रस्थ. त्यांच्याकडे आठ-नऊशे एकर बागायत शेती आहे. तालुकाभर त्यांचे नातेवाईक आहेत. वरपर्यंत वजन आहे. बामणीचे देशमुख यांच्या शब्दाला मान देऊन आबासाहेबांना तिकीट दिले जाते. विरोधी पक्षाच्या मंडळीना वाटत होते की अनिल कुंभार सर्वांना मदत करतो, शेतक-यांमध्ये लोकप्रिय आहे. याला तिकीट दिले तर तालुक्यातील तरुण मुले कामे करतील, परंतु कोण चांगले, कोण वाईट याचा विचार न करता राजकीय लोक अनिल कुंभारच्या नावाला विरोध करु लागले. अनिल कुंभार चांगला कार्यकर्ता आहे पण त्याच्याजवळ पैसा नाही. म्हणून त्याला तिकीट मिळाले नाही.

विरोधी पक्षाच्या मिटींगमध्ये हिरालाल पोरवालने गोविंदराव बोराडेंचे नाव सांगितले. कारण अग्रवालांना तिकीट मिळू न देणे हा त्यांच्या प्रतिष्ठेचा विषय होता. बोराडे हे अस्थिर वृत्तीचे आहेत. त्यांचे नाव समन्वय समितीच्या अध्यक्षांना मान्य नसते. तरीही विरोधी पक्षाजवळ असलेली पुण्याई पोरवाजलींनी खर्ची घातली. सर्व सामर्थ्य पणाला लावून कित्येक तासाच्या बैठकीनंतर बोराडेंचे नाव जाहीर झाले. यामुळे अनिल कुंभारची स्वप्ने धुळीला मिळाली. अनिल कुंभारसारख्या कार्यकर्त्याला टाळून बोराडेसारख्या माणसालातिकीट दिले हे नाराय-णाला पटले नाही. सत्ताधारी पक्षाचे व विरोधी पक्षाचे उमेदवार सामान्य माणसांचे व संघटनेचेही काम पहात नव्हते. एक न सुटणारा प्रश्न नारायणाच्या पुढे उभा राहिला.

रंगनाथची बायको प्रौढ आहे. तिची मुले मोठी आहेत. रंगनाथ घराकडे लक्ष देत नाही. म्हणून ती मोलमजूरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. एकदा काही काम नाही म्हणून ती गवत आणायला इनामदाराच्या मळयात गेली. तिच्यावर बलात्कार झाला . ही बातमी सर्वत्र पसरली. गावातील लोक विविध तर्क मांडून तिची चर्चा करू लागले. ही बातमी हिज्डयाच्या कोंडाळयात बसलेल्या रंगनाथला कळल्यावर त्याच्या हाता-पायातील बळच संपले.

संघटनेच्या कार्यकर्त्यांची बैठक झाली होती. दोन्ही डॉक्टर, पोलीस, अधिकारी त्याचदिवशी जिल्हयाला गेले होते. म्हणून कार्यकर्ते ठरवितात की चौकीवर जाऊन पोलीसांना बाहेर काढायचे. जिल्हयाला गेलेले ऑफिसर, फौजदार यांनाही तारेने कळवायचं. इनामदार व्यक्ती मोठी वजनदार व धनवान असल्यामुळे तो रंगनाथाच्या बायकोचे प्रकरण दडपून टाकेल म्हणून हे प्रकरण पध्दतशीर हाताळायचं. साहजिकच या गोष्टीमुळे नारायणाचे नेतृत्त्व व संघटना उजळून निघणार होती.

गावात रंगनाथच्या बायकोचे प्रकरण घडून दोन-तीन दिवस होऊन गेले. लोकांनी कोणतीही हालचाल केली नाही. इनामदाराचा मुलगा व साथीदार राजरोसपणे फिरत होते, तरीही पोलीस त्यांना पकडत नव्हते. रीतीप्रमाणे जिल्हयाच्या पोलीसांनी रंगनाथची व त्याच्या बायकोची जबानी घेतली. आठ दिवसात गुन्हेगाराला अटक करू असे त्यांना सांगितले. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कुसुमव तिच्या मैत्रिणींना रिपोर्टर्स, बातम्या लिहिण्याचे काम दिले. संघटनेतील मुले शांतता भंग करून नको ते उपद्व्याप करू लागले. त्यांनी गावातील कायदा धाब्यावर बसवून तणाव निर्माण केला. परवानगीशिवाय कार्यालयावर मोर्चा काढला. हे सर्व " जनमत "च्या अंकात छापले म्हणून कार्यकर्त्यांनी जनमतच्या कार्यालयावर मोर्चा काढला. बंदोबस्ताला असणा-या पोलिसांनी राघवेंद्रला बाहेर काढल्यावर त्याने नमस्कार केला. तो सर्वांना म्हणाला, आमच्या वार्ताहराने जे सांगितले ती बातमी छापली. पण " जनमत-" ला वार्ताहर नव्हता हे राघवेंद्रने सांगितलेच नाही.

नारायणने आबासाहेबांच्या वाडयावर मोर्चा नेला. तो आबासाहेबांना म्हणाला," गावात निर्माण झालेल्या प्रश्नाबद्दल सांगा... ही तुमच्या प्रचाराची सभा नाही." यावेळी जमलेले लोक म्हणाले, " गुन्हा घडवणा-या शासनव्यवस्थेचा, गुन्हेगारांना पाठीशी घालणा-यांचा, खोटे वृत्त देणा-या संपादकांचा धिक्कार असो ! या घोषणांमुळे देशमुख अडचणीत सापडले. तरी अडचणीतून मार्ग काढून ते लोकांना म्हणाले की, " एखादया गरीब, निरापराध बाईवर दिवसाढवळया अत्याचार करणा-या बदमाशांचे हात कलम केले पाहिजेत. शासन त्यांना सोडणार नाही. मित्रहो, तुमच्यासारखीच माझीही भूमिका आहे हे लक्षात ठेवा. या संदर्भात जेवढं करता येईल तेवढं करेन असं मी तुम्हाला जाहीर आश्वासन देतो." नारायणने त्यांना निवेदन दिल्यावर देशमुखांनी मुख्यमंत्र्यांना फोन केला. ते नारायणला म्हणाले की, " तुमचे आमचे जुने संबंध आहेत. खरं म्हणजे तुझ्यासारख्या तडफदार तरूणाचे चीज होत नाही बघ आपल्या समाजात."

सर्व ठिकाणी बातम्या, फोन, तारा, निवेदने, अर्जविनंत्या पोहचल्या, परंतु लोकांनी हालचाल केली नाही. रंगनाथय्या बायकोचे प्रकरण विसरुन लोक निवडणुकीची चर्चा करू लागले. उदास मनस्थितीत नारायणाने कार्यकर्त्यांची बैठक बोलावली. बैठकीला कुसुम आली नाही. यावेळी नारायणाला वाटले की संघटनेतील एका कार्यकर्त्यांचे काम कमी झाले. कुसुम काम करायला येते तर तिच्या आई-वडिलांनी तिला विरोध केला.

झरीचे गोविंदराव बोराडे आमदार व मुख्यमंत्री झाले.चव्हाण व बोराडेसारखे लोक स्वत:चे हितसंबंध राखून कामे करत होती. अनिल कुंभारने नारायणाला सांगितले, " बोराडयांच्या पाच-सात शाळेतील शिक्षकांना पगार मिळत नाही. तर तो बँकेत जमा होतो. त्याने जमिनी खूप बळकावल्या आहेत. सत्ताधारी काय, विरोधी काय सर्वजण सारखेच आहेत" गोविंदराव बोराडेंचा बंगला म्हणजे भक्कम गढीच होती. या गढीमध्ये बोराडे राहतो. मागच्या निवडणुकीत चव्हाणाने इनामदाराला पाठिंबा दिला. यावेळी इनामदार गप्प आहेत. जिथं भरदिवसा गुन्हे करुन लपवले जातात. तिथं काहीही घडू शकतं. ते सर्व ऐकल्यावर नारायणाला वाटले, लोकांना समोर घडलेले दिसत असतानाही त्यांनी काहीही दिसू नये म्हणून गांधारीसारखी डोळयावर पट्टी का बांधली आहे ?

जे सत्त्वशील आहेत ते नष्ट झाले. जे सत्तेच्या बुरख्यात लपलेले आहेत ते उजळ माथ्याने मिरवतात. नारायणाला वाटते आबासाहेब, चव्हाण, बोराडे वाईट आहेत हे तरी कशावरुन ? ते निवडून आले तरी काय फरक पडणार आहे ? शेवटी समाजातील कर्ते, श्रेष्ठ, नीतिमान तेच आहेत. आपण मात्र कीटकाप्रमाणे आहोत. निवडणुक म्हणजे खडक आहे. हा खडक कुणी निर्माण केला असेल हा विचार त्याच्या मनात येतो. त्याला वाटते की लग्न करुन सुखाने राहण्यापेक्षा अश्वत्थामा म्हणून का जन्मलो ? जे जखमी झाले तेच गप्प आहेत. आपण काय म्हणुन दुसऱ्याच्या जखमा काळजावर

गोंदवून हिंडत आहोत !

निवडणुकीची फॉर्म भरण्याची मुदत संपत आली. आबासाहेब व बोराडे हे उमेदवार म्हणून संघटनेच्या कार्यकर्त्यांना मान्य नव्हते. निवडणुकीमध्ये भाग घेतल्यानंतर सामाजिक प्रश्न, पोटापाण्याचा प्रश्न सुटेल असे संघटनेतील कार्यकर्त्यांना वाटते. म्हणून नारायणने अनिल कुंभारला निवडणुकीला उभे राहा असे म्हटल्यावर तो म्हणाला, "तुझ्या माझ्या सारख्यांना यश येणार नाही. निवडणुकीत उभे राहिलेले उमेद्वार रेसचे घोडे आहेत. नारायण तू वेडा आहेस, आपण रेसचे घोडे होणार नाही".

रंगनाथची बायको नारायणच्या घरी जाऊन त्याचे पाय धरून म्हणाली, " अरं, कुठंच न्याय मिळत नाही गरिबाला. मोठ्यांनी कायदा करायचं अन् निबवून न्यायचं हे पूर्वीपासून चालले आहे: तुम्ही जिल्ह्याला जाऊन उपयोग होणार नाही. माझ्यापासून पोरं दूर राहतील, मला सगळेयरे विचारणार नाहीत. हे ऐकल्यावर नारायणला वाटेत की तिचा काहीही दोष नाही. तरीही ती बाई समाज सुटेल या भीतीने गप्प बसते. कुणी हिला लुळी-पांगळी व मनाने विकलांग केली ! नारायणाचे वडिल त्याला म्हणतात, " बघितलंस ना नारायणा, सर्व स्वप्नांचे खून करणारे हे जीवन आहे. आपल्या सारख्यांच्या आयुष्याची माती झाली तरीही या लोकांना काही वाटत नाही. सर्व आयुष्य मी या लोकांच्यासाठी खर्च केले. पण गरीब लोक अत्याचार सहन करून त्याचवाटेला गेले."

निवडणुकीसाठी नारायणने चमेलीला उभे केल्यानंतर मुंबईच्या पत्रकाराने विचारले, " एका हिजड्याला उभं करावं असे आपणास का वाटले !"नारायणने त्यांना उत्तर दिले की, " तुम्ही रामायण वाचले असेल ! प्रभू रामचंद्राबरोबर सीता, लक्ष्मण वनवासाला निघाले, सर्व नगरी शोकाकूल होऊन हुंदके देऊ लागली. प्रभु रामचंद्र प्रणाम करून त्यांना म्हणाले, " अयोध्या-निवासी नर-नारींनो, कुठपर्यंत येणार असे ! परत फिरा आम्हाला आमचं कर्तव्य करू दया....हे सांगूनही

लोक परतले नाहीत. पुन्हा प्रभू रामचंद्र लोकांना म्हणाले, "तुम्ही सगळे काय म्हणून थांबलात ! आपणाही जा. चौदा वर्षानंतर आपल्या भेटीसाठी आम्ही येतच आहोत." हे ऐकून शोकाकूल जनसमुदाय परत गेला. त्यांना प्रभू रामचंद्रांनी आशीर्वाद दिला. " जा, तुमचं राज्य विसाव्या शतकात अवतरेल... याच पवित्र भूमीवर त्यावेळी भारतखंडातील सर्व भागात मोठ-मोठया कार्यालयातून अधिकार पदावर चमेलीसारखे लोक असतील. तुमची प्रतिष्ठा, दबदबा वाढलेला असेल. प्रामाणिक माणसं उपहासाचा विषय होतील". हे ऐकून गर्दीतील एकजण नारायणाला म्हणाला, " रामायण तुम्हाला आजच का आठवले ?" नारायणाने गृहमंत्र्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत केलेल्या तारा दिलेली निवेदने, अर्जविनंत्या या गोष्टी फाईलमध्ये लिहून ठेवल्या होत्या. ती रामायणाचीच फाईल त्याने पत्रकारापुढे टाकली. पत्रकाराने फाईलमध्ये होते ते लिहून घेतले. ज्यांना कळले नाही त्यांनी पुन्हा प्रश्न विचारला, निवडणुकीला हिजड्याला उभं करण्याचा काय संबंध? नारायणाने त्यांना सांगितले, गुन्हेगार उजळ माथ्याने फिरतात तरी पोलीस त्यांना पकडत नाहीत. चमेलीमध्ये व उभे राहिलेल्या लोकांच्यात कायफरक आहे.? । चमेलीही निवडणूकलढविणारच असे तो ठासून सांगतो.

नारायणाला वाटते, निवडणुकीमुळे लोकांमध्ये राजकीय जागृती निर्माण होईल. तर काही उमेदवारांनी चमेलीसारख्या शिखंडीबरोबर लढावे लागणार म्हणून उमेदवारीच मागे घेतली. काही उमेदवार निवड-णुकीमुळे जनसंपर्क वाढतो, निधी जमा होतो, म्हणून उभे राहिले होते. मालिनीबाई देखील निवडणुकीला उभ्या असतात. त्या खूप शिकलेल्या होत्या. खेड्यातील सर्व कामे करत होत्या. म्हणून गावातील लोकांना त्यांचे आश्चर्य वाटत होते. सत्ताधारी पक्षावर दबाव आणण्यासाठी इनामदाराने बाईंचा फार्म भरलेला असतो.

गोविंदरावाचे वक्तृत्व चांगले आहे. त्याचा फॉर्म भरल्यापासून जीप्स, पन्नास-शंभर मोटार सायकली प्रचार करायला फिरू लागल्या. सभेला पन्नास-साठ लोक असले तरी हजारोंचा जनसमुदाय आहे अशा थाटात ते भाषण करत होते.

प्रचारमोहिमेत कार्यकर्त्यांना वेगळे चित्र पहायला मिळेल. एक उमेदवार स्वतःच रिक्शातून प्रचार करत सांगत होता की, " मतदार बंधु-भगिनींनो तुमच्यासमोर विधान सभेचा गरीब, सज्जन, नम्र, सालस, कामसू उमेदवार पंढरीनाथ काचुरे उभा आहे. मी शिक्षक, पत्रकार, वारकरी आहे. माझे चिन्ह गरुड आहे," हे त्याचे बोलणे ऐकून कार्यकर्ते हसले त्यांना नारायण म्हणाला, 'तो आपल्यासारखाच वेडा आहे.'

एकेदिवशी दिवसभर प्रचार करून कार्यकर्ते रात्री झोपले. अशावेळी झोकांडया देत येत असलेल्या चमेलीला पाहून नारायणाने त्याला धरून आणले व विचारले, " कुठं गेला होतास, तू चमेली ? " चमेली नारायणाला म्हणाला, " भाऊ, रागावू नकोस. पूर्वी तालुक्याला माझा मित्र आला की मला भेटल्याशिवाय जायचा नाही. त्या मित्राकडे गेलो होतो. लयी दिवस उपास घडला. अन् जन्माची सवय जाते का"? हे ऐकून नारायण त्याला म्हणाला, " आता कोणत्या न्हाव्याचे घर उद्ध्वस्त करणार आहेस" ? चमेलीच्या या वागण्यामुळे नारायणाला काय करावे तेच कळले नाही. तरीही त्याला वाटते चमेली प्रामाणिक आहे.

त्यानंतर एकदा संघटनेचे कार्यकर्ते दूर-पर गावी प्रचार करायला गेले. तिथे त्यांना वेगळे चित्र पहायला मिळाले. सभेला मंडप घातला होता. त्या मंडपामध्ये आबासाहेबांच्या प्रचाराच्या लावण्या कुणी-तरी लिहून दिल्या होत्या. तमाशातील लोक त्या लावण्या म्हणत होते. त्याठिकाणी नारायणाने भाषणामध्ये सांगितले की, सत्ताधारी पक्ष सत्तेसाठी हापापलेला आहे. अशी घणाघाती टीका नारायणाने सुरू केली

तिकडे मालिनीबाई व इनामदाराने गोर-गरिबांना मोफत साडया दयायच्या ठरवल्या. शिंदीच्या दुकानात लोकांना हवी तेवढी दारु दयायला सांगितले. नारायण व चमेली यांनी उघडलेल्या मोहिमेमुळे आबासाहेबांचा लोचटपणा, लाळघोटपणा, संधिसाधूपणा, मालमत्ता या गोष्टींचा उलगडा झाला. बोराडें व आबासाहेब सत्तेसाठी, स्वत:च्या हितसंबंधासाठी वाटेल त्या तडजोडी करत होते हे नारायणाच्या मोहिमेमुळे लोकांना माहित झाले.

या मोहिमेमुळे मालिनीबाई पैठणकर त्रासल्या होत्या. त्या लोकांना म्हणाल्या, " माझ्याकडे पहा, इनामदाराकडे पहा, आम्ही असे करु असे वाटते का तुम्हांला !... इनामदाराचा मुलगा माझा आहे. इनामदार शत्रू आहेत त्यांच्याबरोबर भांडा, निरापराध पोराला शिक्षा कशाला ! तुमच्यापैकी तालुक्याच्या ठिकाणी जाऊन न्हाव्याच्या बायकोला भेटा व विचारा. तिने खरे आहे असे सांगितले तर तुम्ही म्हणाल ती शिक्षा भोगू. ती खोटे आहे असे म्हणाली तरच आम्हांला मते दया" मालिनीबाई प्रचार करताना रस्त्यावर लहान मुलगा आडवा झाला तर स्वत:च्या कपडयाची पर्वा न करता त्याला उचलून घेत. कुणाच्याही घरी जाऊन त्यांना ताई, मावशीचे नाते लावून व भाकरी मागून घेऊन खात पुढील प्रचाराला जात.

अशाही परिस्थितीत आबासाहेबांनी धीर सोडला नाही. बामणीचे देशमुख इरेला पेटले होते. गावातील लोक आबासाहेब व बामणीचे देशमुख यांच्या बाजूने असल्याचा बहाणा करत होते. प्रत्येक गावातील गल्लीमध्ये प्रचार साहित्य पोहचले होते. सावकार जमीनदार, उदयोगपती स्वत:चा घोडा श्रेष्ठ असल्याचा बहाणा करुन निवडणुकीत उतरले होते.

गोविंदराव, आबासाहेब रेसचे घोडे, पैसा, लावणारे खरेखुरे कार्यकर्ते आहेत. या रणधुमाळीत शिरलेला नारायण म्हणतो, " आपण एका बुडत चाललेल्या संघटनेच्या एका शाखेवर काम करणारे एक यक:श्चित कार्यकर्ते वठलेल्या वृक्षाची एक फांदी हिरवीगार असावी

तशी आपली शाखा आहे. आपल्याजवळ पैसा, सत्ता नाही. कोणाची दिशाभूल करता येत नाही. निवडणुकीत विचार घेऊन उतरलो ते खोटे तर नसतील ! " याच विचारात नारायणला झोप लागली. कुठं तरी वाचलेले त्यांच्या स्वप्नात आले. अश्वमेध, धगधगणारा यज्ञकुंड त्याभोवती ब्राह्मण वेद म्हणत होते. घोडा आणून बांधला त्याच्या बाजूने पडदे ओढले. मंत्रघोष सुरू झाला. चमेली व मालिनीबाई नटून आल्या. चमेली मालिनीबाईंना ढकलून आत गेला. घोडा सर्वांना ओलांडून पळत सुटला. व चमेली खाली पडला. तेवढयात नारायणला एकदम जाग आली.

नारायणला वाटते, निवडणुकीच्या रेसमधून बाहेर पडावे, आपले इथं काय काम आहे. आई -वडील वाट पाहून थकले असतील. माझ्या कामाबद्दल, कार्याबद्दल किती लोकांना सहानुभूती वाटली. न्हाव्याच्या बायकोच्या प्रकरणावर तोडगा काढला तर लोकानी मला वेडयात काढले. आपल्यात काही अर्थ नाही. आपण ज्यांच्यासाठी कामे केली ते तरी कशावरून भांडणार नाहीत !

निवडणुकीचे चित्र पालटते. मतदान चार दिवसावर आले होते. रंगनाथच्या बायकोने इनामदाराच्या मुलाला तोडवून आणायला काही तरी लिहून दिले. सत्ताधारी पक्षाच्या सरकारने वकिलाला कमकुवत भूमिका घ्यायला लावून इनामदाराच्या मुलाला तोडवून आणले. ही बातमी नारायणला कळल्यावर तो पोलिओ झालेल्या माणसासारखा विकलांग झाला. त्यामुळे दिवस असून त्याला सर्वत्र काळोखच दिसत होता. या सर्वांना कंटाळून नारायण त्याच्या गावी निघून गेला. गावाच्या वेशीत गेल्यावर त्याला इनामदाराच्या मुनिमाच्या मुलाची वरात दिसली. त्या वरातीतील नववधु कुसुम आहे हे पाहून त्यांच्या हातापायातील बळ संपले. आई-वडील कार्यकर्ते या सर्वांना तोंड न दाखवताच जावे लागणार या कल्पनेने त्याला वाईट वाटते. तो खाली कोसळताना नववधु कुसुमच्या जागी रंगनाथची बायको दिसते. तेव्हा आपले स्वतःचे

परिवर्तन क्रमाक्रमाने चमेलीमध्ये होत आहे असे त्याला वाटू लागते.

## सारांश :

लेखकाने या कादंबरीत राजकीय सत्तास्पर्धेचे जिवंत चित्रण केले आहे. निवडणुकीला उभे राहिलेले उमेदवार स्वत:चे हितसंबंध राखून दुस-याची कामे करून देतात.

राजकारण, त्यातल विविध धागे, गुंतागुंत याबरोबर कौटुंबिक जीवन, खाजगी जीवन या गोष्टी कादंबरीत आल्या आहेत. गोविंदराव, आबासाहेब, बामणीचे देशमुख हे सत्तेसाठी हापापलेले चोर राजकारणात आले. त्यांनी स्वत:च्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी सर्व तडजोडी केल्या. राजकारण हे सत्तास्पर्धेचा खेळ आहे. जे परिवर्तन होते ते घोषणांमध्ये आणि स्वार्थी राजकारणामध्ये विरून जाते आहे. हे चित्र या कादंबरीत दिसते.

अशाप्रकारे प्रस्तुत कादंबरीच्या कथानकाचा अभ्यास केल्यानंतर, त्यातील व्यक्तिरेखा आणि त्यांच्यातील परस्परसंबंध यांचा विचार अभिप्रेत आहे.

## " गांधारीचे डोळे " या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा :

### नारायण कल्लोळी :

नारायण कल्लोळी ही या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. नारायण नानासाहेबांच्या संघटनेमध्ये काम करत असतो. त्याच्या आई-वडिलांना वाटे, एकुलतं एक पोरंग त्याला भरवावं, त्याची काळजी घ्यावी. पण त्याचं सारं तंत्रच निराळं आहे. म्हाताऱ्या आई-वडिलांना त्रास कशाला दयायचा म्हणून नारायणाला शेवटी हाताने वाढून घेऊन जेवायला आवडत असे. तो संघटनेतील मुले वाट पाहात असतील म्हणून जायला निघतो तेव्हा त्याला अंधुक प्रकाशात रस्त्याच्या कडेला रक्ताच्या थारोळयात पडलेली एक स्त्री दिसली. ते दृश्य पाहून नारायण एकदम दचकतो. वास्तविक ती स्त्री नसून तो चमेली असतो. पण या प्रसंगावर आबासाहेबांच्या " जनमत " मध्ये छापून येते की, " हिजड्यांना घाबरणारा माणूस जीवनात काय करू शकणार आहे ! याला नेहमीच " दृष्टिभ्रम " होतात"? ही बातमी वाचून लोक नारायणाला दोष देऊ लागले. लोक काय म्हणतात याकडे लक्ष न देता नारायण चमेलीचाच विचार करतो. चमेली बेहोष होऊन का पडला असेल, त्याचे गाव कुठे असेल, तो काय खात असेल.? एकदा नारायण चमेलीच्या घरी गेला. त्याच्या घरी चार-पाच हिजडे झोपले होते. चमेली परकर शिवत बसला होता. ते सर्व पाहून नारायणाला किळसच आली. आपण कशासाठी इथे आलो तेच त्याला कळेना. त्यानंतर नारायणाने त्याच्या वस्तीतील मुलांसाठी रात्रीची शाळा सुरू केली. चमेलीला व रंगनाथला तिथे शिकवण्यास ठेवले.

रंगनाथच्या बायकोवर बलात्कार झाला. त्यादिवशी सर्व पोलीस अधिकारी, हॉस्पिटलमधील मेडिकल ऑफिसर जिल्हयाला गेले होते. तिला न्याय मिळवून देण्यासाठी नारायण व कार्यकर्ते उपोषणाला बसण्याचा

विचार करतात. रंगनाथची बायको हॉस्पिटलमधून नारायणाच्या घरी आली व त्याचे पाय धरून म्हणाली, " भाऊ, जिल्हयाला जाऊन उपयोग होणार नाही. आम्हां गरिबाला कुठं न्याय मिळत नाही. मला सगेसोयरे, समाज, मुले विचारणार नाहीत", असे सांगून ती गप्प बसते.

नारायण निवडणुकीत चमेलीला उमेदवार म्हणून उभ करतो. एका हिजडयाला उभ करावं असे आपणास का वाटले या प्रश्नांचे उत्तर देताना नारायण म्हणतो, " तुम्ही रामायण वाचलंच असेल, प्रभू रामचंद्राबरोबर सीता, लक्ष्मण वनवासाला निघाले असता सर्व नगरी शोकाकुल होऊन हुंदके देऊ लागली. प्रभू रामचंद्र प्रणाम करून त्यांना म्हणाले, " अयोध्या - निवासी नर-नारींनो, कुठंपर्यंत येणार असे ? परत फिरा. आम्हाला आमचं कर्तव्य करु दया". हे ऐकून काही लोक परतले व काही थांबले. त्यांना प्रभू रामचंद्र म्हणाले, " चौदा वर्षानंतर आपल्या भेटीसाठी आम्ही येत आहोत ! जा जा तुमचं राज्य विसाव्या शतकात याच पवित्र भूमीवर अवतरेल"! हे ऐकून शोकाकुल जनसमुदाय मागे फिरला. गर्दीतील एकाने त्याला विचारले तुम्हाला आजच का रामायण आठवले. तर नारायणाने तह-सीलदारापासून मुख्यमंत्र्यापर्यंत केलेल्या अर्जविनंत्या, फोन, तारा, व दिलेली निवेदने फाईमध्ये नमूद करून ठेवली होती. त्या रामायणाची फाईल त्याने सर्वांसमोर टाकली. पत्रकाराने व वार्ताहराने फाईलमधील मजकूर लिहून घेतला.

संघटनेच्या कार्यकर्त्यांनी एके ठिकाणी मुक्काम केला. सर्व कार्यकर्ते झोपलेले असतात. नारायण झोपत नाही. तो विचार करत बसलेला असतो. चमेली दारू पिऊन झोकांडया देत पायऱ्या कशा तरी चढत येत आहे हे पाहिल्यावर नारायणाने त्याला धरून आणले व विचारले, " कुठं शेण खायला गेला होतास !" चमेलीने नारायणाचे पाय धरून सर्व प्रामाणिकपणे सांगितले.

एकदा नारायण पंधरा दिवसाच्या प्रवासाने कंटाळून झोपला होता. त्याने कुठं तरी वाचलेले त्याच्या स्वप्नात आले. अश्वमेध यज्ञाभोवती ब्राह्मण मंत्र म्हणत होते. घोडा आणला जातो. चमेली व मालिनीबाई नटून आल्या. चमेली पडदा सारुन आत गेला. घोडा उधळून निघून गेला. चमेली खाली पडला. या स्वप्नामुळे नारायण उदास झाला. इनामदाराच्या मुलाला सोडवून आणण्यासाठी काही तरी रंगनाथच्या बायकोने लिहून दिले. ही बातमी नारायणाला कळल्यावर तो पोलिओ झालेल्या माणसांसारखा विकलांग झाला. अन्याय, अत्याचार रंगनाथच्या बायकोवर न होता स्वत:वर झाला आहे असे त्याला वाटते.

नारायणाने निवडणुकीचा, चमेलीचा विचार करायचे सोडून दिले. आपल्या कामाबद्दल किती लोकांना सहानुभूती वाटली. रंगनाथच्या बायकोचे प्रकरण धसास लावताना लोकांनी मला वेढयात काढले. गोविंदराव बोराडे, मालिनीबाई पैठणकर, आबासाहेब देशमुख हे सिंह आहेत. त्यांनी घेरलेल्या वर्तुळातील आपण बळी आहोत . या सर्वांतून सुटले पाहिजे. आपल्या गावाकडे काय चालले असेल. आई-वडिल वाट पाहून थकले असतील असे त्याला वाटते.

नारायण पळून गावाच्या वेशीपर्यंत गेला. त्याला मुनिमाच्या मुलाची वरात आलेली दिसली. वरातीत कुसुम नववधू म्हणून बसली आहे हे पाहून तो उदास झाला. खाली कोसळताना त्याला कुसुमच्या जागी रंगनाथची बायको दिसली. उदया सकाळी कोणालाही तोंड न दाखवता, आई-वडिलांना न भेटता जावे लागणार या कल्पनेने नारायणाच्या हातापायातील बळ संपले. क्रमा-क्रमाने आपल्यामध्ये चमेलीप्रमाणे परिवर्तन होत आहे असे त्याला वाटू लागते.

एकूणच उभे राहिलेले उमेदवार संघटनेचे काम पाहणार नाहीत. म्हणून नारायणाने चमेलीला निवडणुकीला उभे केलेले असते. नारायणाचे सर्व आयुष्य संघटनेसाठी, समाजासाठी राजकारणातील निवडणुकीसाठी गेले. त्याने स्वत:चा स्वार्थ पाहिला नाही. नानासाहेबांच्या संघटनेचे

नाव राखले. नारायणासारखी विश्वासू माणसं असल्यावर समाजातील कुठलीही परिस्थिती सुधारायला वेळ लागणार नाही. परंतु त्याच्या कर्तृत्वाला कुठलाही वाव मिळत नाही असे दिसून येते. वरीलप्रमाणे नारायण कल्लोळी कादंबरीचा नायक, समाजकार्य करणारा कार्यकर्ता असतो. पण त्याच्या पदरी शेवटी अपयशच येते.

चमेली :
--------

चमेली चवथी -पाचवीपर्यंत शिकलेला आहे. तो ऑफिसमध्ये चपराशाची नोकरी करतो. गोऱ्यापान चेहऱ्यावर शोभणाऱ्या मिशा हा त्याच्या अभिमानाचा विषय आहे. आई-वडिलांने चांगली मुलगी पाहून त्याचे लग्न केले. सून घरी आली. तिला मुलं होत नाहीत. कारण चमेलीमध्ये दोष होता. डॉक्टरकडून इलाज केला. नवससायास, गंडेदोरे, साधूसंन्याशी, देवदेवर्षीही केले. त्याला कुठला देव पावला नाही. चमेली कपड्यावरुन हात फिरवत आहे हे पाहिल्यावर त्याची बायको त्याला म्हणाली, " तू हात लावू नको... तुझा तो गलिच्छ, घाणेरडा हात माझ्या कपड्यांना लावू नकोस. " हे ऐकून स्वतःचे घरातले अस्तित्व संपले आहे असे त्याला वाटते.

चमेली नपुंसक आहे हे कळल्यावर काही नपुंसक लोक त्याला आपल्या जथ्यात घेऊन जाण्यासाठीआले. ते म्हणू लागले. " चमेली निघून ये. इथं तू आता निरूपयोगी झाला आहेस तुझी बायको तुला नीट बघत नाही. ये आमच्यात मिसळ, यातच सुख आहे. इथले लोक तुला कावळ्यासारखे टोचून जखमी करतील. त्या जखमा सडत जावून किडे भरतील. असं सडत मरण्यापेक्षा सुखाने मर " हे ऐकून चमेली त्यांच्याबरोबर जातो. तिथे त्यांनी त्याला स्त्रियांची कपडे घालण्यास दिली. गुरुमाऊली मंत्र म्हणाली व चमनरावाचं नाव बदलून चमेली ठेवून मिठाई वाटली.

एकदा एके ठिकाणी चमेलीचा प्रचार करून उशीर झाला म्हणून सर्वांनी मुक्काम केलेला असतो. सर्व कार्यकर्ते झोपले होते. नारायण विचार करत बसला होता. तर चमेली झोंकाडया देत कशा तरी पायऱ्या चढत येत असलेला त्याला दिसला. नारायणाने त्याला धरून आणून विचारले, कुठं गेला होतास शेण खायला ! चमेलीने नारायणाचे पाय धरून सांगितले माझा एक जुना मित्र आहे. तो तालुक्याला आला की माझ्याशिवाय दुसरीकडे जायचा नाही. तो मला म्हणायचा, " चमेली मेरी जान किती सुंदर दिसतोस तू काय करावं भाऊ, लयी दिवस उपाशी -हायचं..अन् जन्माची सवय जाते का ! हे ऐकून नारायणाला काय करावे तेच कळत नाही.

एकूणच, चमेलीच्या वागण्यात काही दोष नसतो. त्याचे नैसर्गिकरित्या पौरूषत्व नष्ट झाले होते. चमेली साधा-सरळ व प्रामाणिक आहे. नारायणाने चमेलीच्या नावावर निवडणुकीचा फॉर्म भरला परंतु लोकांनी त्याला मिसळून घेतले नाही.

आबासाहेब देशमुख :
-----------------

आबासाहेब देशमुख मूळचे सावळीचे रहिवासी आहेत. त्यांच्या मालकीचा छापखाना आहे. त्यांचा " जनमत " हा अंक निवडणुकीचा मौसम आला की नियमित निघत होता. आबासाहेबानी कोणतेही सामाजिक कार्य न करता " जनमत " च्या पहिल्या पानावर त्यांचे बातम्या, फोटो, छोटे लेख येत असत. या बातम्या वाचून लोक आबासाहेबाची तिठयातिठयावर, दुकानातून चर्चा करू लागले. तरीही आबासाहेबांनी नारायणाच्या घरी जाऊन विचारपूस केली व त्याला म्हणाले, " नारायणा आधी लग्न उरकून घ्या...अन् नंतर करा सामाजिक कामे, आम्हीही मदतीला येऊ"

शाळेतील शिक्षकाला एका माणसाने मारल्यानंतर गावातील लोक आबासाहेब प्रतिष्ठित माणूस म्हणून त्यांच्याकडे न्याय मागायला गेले. त्यांनी न्याय दिला नाही. उलट ते शिक्षकाला म्हणाले अशी प्रकरणे वाढू देऊ नयेत. गावच्या अब्रूचा प्रश्न आहे. तसेच त्यांनी त्या शिक्षकाला पोलीस स्टेशनला तक्रारही नोंदवू दिली नाही. नारायणाला वाटते, गुन्हेगाराला शासन झाले पाहिजे. म्हणून त्याने मोर्चा काढला. आबासाहेब नारायणाला म्हणाले, " जाऊ दे नारायणा तो माणसूच बदमाश आहे. समाज आपल्या दहा हाताने चांगले करतो. असा एखादं दुसरा असणारच: तरीही नारायण त्यांना म्हणाला, " शिक्षकाच्या प्रतिष्ठेचे काय ! शिस्तीच काय " ! हे ऐकून आबासाहेब त्याला म्हणाले, " अरे, समाजात सर्वांना सांभाळून घ्यावे लागते. "

आबासाहेबांनी भाषणामध्ये लोकांना सांगितले की, सत्ताधारी पक्षाने गरिबांना भाकर देण्याचा कसा प्रयत्न केला. हे ऐकल्यावर नारायण त्यांना म्हणाला ही तुमच्या प्रचाराची सभा नाही. यावेळी सर्व लोकांना शांत करून आबासाहेब म्हणाले की " मित्रहो", समाजातील मस्तवाल प्रवृत्तीच्या लोकांना शासन होणार आहे. " निरापराध बाईवर दिवसाढवळ्या अत्याचार करणाऱ्या बदमाशाचे हात कलम केले पाहिजेत. शासन त्यांना सोडणार नाही. तुमच्यासारखीच माझी भूमिका आहे; ते नारायणाला म्हणाले, ' तुझ्यासारख्या तडफदार तरुणाचे चीज होत नाही बघ या समाजात' सर्व बाजू नीट समजून घेऊन बाईची बदनामी होते याचाही विचार आपण केला पाहिजे, असे आबासाहेब लोकांना सांगतात. परंतु यात ढोंगीपणाच आहे.

आबासाहेबांच्या प्रचाराचा नारळ फोडून लक्ष्मण रत्नागिरीकर यांनी सुयश चिंतणारी प्रार्थना केली. लोकांच्या दृष्टीने आबासाहेब म्हणजे कमालीचा लोचट आणि पायचाटू माणूस आहे. त्यामुळे लोक मन लावून त्यांचा प्रचार करत नव्हते. नारायणाने उघडलेल्या मोहिमेमुळे आबासाहेबांचा लोचटपणा, लोळघोटपणा त्यांनी जमवलेली मालमत्ता या साऱ्या गोष्टी लोकांना माहिती झाल्या.

तरीही आबसाहेबांनी धीर सोडला नाही. लोक मतदार संघात आले. परिस्थिती पाहून कामाचा बहाणा करू लागले. खोटे-नाटे हिशोबसादर करु लागले. निवडून येण्यासाठी त्यांनी लोकांना पैसे देखील दिले.

एकूणच, आबासाहेब श्रीमंत आहेत. पण नारायणवचमेली यांनी उघडलेल्या मोहिमेमुळे त्यांची संपत्ती किती आहे ती लोकांना कळली. तरीही आबासाहेब परिस्थितीला सामोरे जावून लढण्याचा प्रयत्न करतात. समाजातील कुप्रवृत्तीचे प्रतिनिधी म्हणून त्यांची व्यक्तिरेखा लक्षात राहते.

कुसुम :

गावातील एक मुलगी कुसुम जिल्हयाच्या ठिकाणी शिकायला गेली होती. ती दिवाळीच्या सुटटीत गावी येते. तिच्याअनेक तरुणांशी ओळखी असतात. कुसुम धीट आहे. ती कोणाशी बोलायला घाबरत नसते. ती व गावातील मुली संघटनेच्या कार्यालयात बसून स्त्रियांच्या प्रश्नांवर चर्चा करु लागल्या. संघटनेच्या कार्यालयात बसणे, चर्चामध्ये भाग घेणे, मुलांबरोबर बोलत बसणे हे तिच्या आई-वडिलांना मान्य नसते. परंतु पोरगी मोठी झाली आहे. घरची सारी शिस्त पाळतेय, समजंस आहे. तरीही गावातील लोक कुसुम व नारायणविषयी काहीही अफवा उठवतात. ते दोघेही लक्ष न देता सामाजिक कार्य करत असतात.

कुसुमसारख्या मुली संघटनेत सामील होऊन स्त्रियांचे प्रश्न सोडवायला मदत करू लागल्या तर ग्रामीण स्त्रिया स्वत: स्वावलंबी बनतील, स्वत:चे प्रश्न सोडवतील असे नारायणाला वाटते.

एकंदरीत बदलती परिस्थिती आणि त्याबरोबरच स्त्रियांवर लादली जाणारी बंधने, यामुळे कुसुमच्या व्यक्तिमत्वाचा विकास न होता, तिला नको असलेल्या मुलाशी तिचे लग्न ठरवले जाते. कुसुमच्या रूपाने ग्रामीण भागातील स्त्रीजीवनाचे चित्र आपल्यासमोर उभे राहते. रंगनाथ न्हाव्याची पत्नी ही व्यक्तिरेखा अभ्यासतानाही हाच प्रत्यय येतो.

<u>रंगनाथ न्हाव्याची बायको ( पत्नी )</u>

रंगनाथची बायको नाकीडोळी, सरस व गोरीगोमटी आहे. तिचा नवरा घराकडे लक्ष देत नसतो. म्हणून ती मोलमजूरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. गवत विकून दोन रूपये मिळतील, कोणी तरी भाजीला देईल या आशेने दिवस मावळतीला गेल्यावर ती गवत कापायला इनामदाराच्या मळयात गेली. इनामदाराचा मुलगा व साथीदार तिच्यावर बलात्कार करतात.

ती बातमी कळल्यावर रंगनाथच्या हातापायातील बळच संपले, तर नारायणाला वाटते जणू आपल्या आईवर बलात्कार झाला. ही बातमी तिच्या मुलांना कळल्यावर त्यांनी गप्प न बसता लखलखता सुरा घेऊन इनामदाराच्या मुलाचा व त्यांच्या साथीदाराचा कोथळा बाहेर काढून रक्ताने सर्व दिशा रंगविल्या पाहिजे होत्या. पण तिच्या मुलांनी काहीच केले नाही.

रंगनाथची बायको हॉस्पिटलमधून नारायणाच्या घरी गेली. नारायणाचे पाय धरून म्हणाली, " वचन दे भाऊ, जे झालं ते झालं. आपण गरीब माणसं. इसरावं लागतं सर्व उदया जिल्हयाला जाऊन उपयोग होणार नाही. अरं, कुठंच न्याय ...

मिळत न्हायी. गरिबाला, मोठयांनी कायबी करायचं अन् निबवून न्यायचं हे पूर्वीपासून चालत आलंय बाबा. गरिबाच्या बायका म्हणाजे मोठयांची खेळणी आहेत. गरिबाला दु:खे, अपमान गुंडाळून ठेवून जगावे लागते. माझी बदनामी होईल. सगेसोयरे मला विचारणार नाहीत. मुलं दुर राहतील. समाज तुटेल."झालं गेलं गंगेला मिळालं झाकली मुठ -हाऊ दया". नारायण तिला न्याय मिळवून देण्यासाठी धडपडतो. परंतु तिने स्वत: पोलीसांना पाहिजे ते लिहून दिले व इनामदाराच्या मुलाला सोडवून आणण्यास मदत केली. या व्यक्तिरेखेच्या द्वारे गरीबीच्या परिस्थितीने गांजलेल्या ग्रामीण स्त्रीजीवनाची परवड चितारली जाते.

गोविंदराव बोराडे :
---------------

झरीचे गोविंदराव बोराडे श्रीमंत आहेत. सात-आठ तास चाललेल्या मिटिंगच्या घोळानंतर उदयोगपती हिरालाल पोरवालने गोविंदराव बोराडेंना तिकीट मिळवून दिले. गोविंदराव अस्थिर वृत्तीचे असतात. त्यांचे अध्यक्षांना नाव मान्य नव्हते. लोकशाहीचे पावित्र्य, मतदानाचे श्रेष्ठत्व सत्ताधारी पक्षाचा मस्तवालपणा, त्याचा भ्रष्टाचार हे शब्द, ते वक्तृत्वपूर्ण शैलीत उच्चारित असले तरी त्याच्या हाडीमासी सत्ताधारी पक्षाची संस्कृती होती. त्यामुळे अनिल कुंभारसारख्या कार्यकर्त्याला टाळून बोराडेंला तिकीट दिले हे नारायणाला आवडले नाही.

गोविंदराव बोराडे आमदार व मंत्री होतात. गोविंदरावाच्या पाच-सात शाळेतील शिक्षकाना पगार मिळत नसतो. यांनी लोकांच्या जमीनी बळकावल्या होत्या.

नारायण व अनिल कुंभार घरी आले आहेत. हे पाहून गोविंद-राव त्यांना म्हणाले, " मी गुन्हेगाराला पकडून देईन, पण मला मदत केली पाहिजे." नारायण सारख्यांना पाणी पाजण्याचे सामर्थ्य गोविंदरावामध्ये आहे. त्यांचे भाषण ऐकून हजारोंचा समुदाय पाच-पाच

मिनिटाला टाळ्या वाजवत असे. मालिनीबाईंच्या वागण्यातील संधीसाधूपणाबद्दल, खोटेपणाबद्दल, त्यांच्या नवऱ्याच्या मृत्यूबद्दल इनामदाराशी असणाऱ्या संबंधाबद्दल तो बोलत असतो. एका विधवेबरोबर लढावे लागते म्हणून त्याने सतीची चाल बंद करणाऱ्या राजाराममोहन रॉयला दोषी ठरवलेले असते.

गोविंदरावांनी निवडणुकीचा फॉर्म भरल्यापासून त्याच्या दहा-बारा जीप्स, पन्नास-शंभर मोटार सायकली प्रचारासाठी फिरू लागल्या. गोविंदराव स्वत:चे हितसंबंध व सगेसोयरे राखून होता. तो सामाजिक कार्य करत नाही. स्वत:च्या कामापुरता तो लोकांसमोर येतो. त्यामुळे समाजात असणारे त्याचे महत्व कमी झाले.

एकूणाच, गोविंदराव फक्त स्वत:चा स्वार्थ पाहतो आहे. त्याचे सर्व आयुष्य दुसऱ्यावर टीका करण्यातच गेले. तो श्रीमंत आहे तरी त्यांच्या पाठीशी लोक राहिले नाहीत. गोविंदराव हे सुध्दा दांभिक राजकारणाचेच एक ओंगळ रूप आहे.

मालिनीबाई पैठणकर :
------------------

मालिनीबाई पैठणकर यांना समाजकार्याची व राजकारणाची आवड आहे. महाविद्यालयात असताना त्या विद्यार्थी संसदेच्या अध्यक्षा होत्या. त्यांचे लग्न झाल्यानंतर त्या सात वर्षांने पुन्हा समाजकार्यास सुरुवात करतात. गावात कोण आजारी असेल त्याला हॉस्पिटलमध्ये नेणे, भांडणे सोडवणे या प्रकारची कामे त्या प्रामाणिकपणे, निष्ठेने करत होत्या. शहरातील शिकलेली बाई खेड्यात राहून काम करत आहे हे पाहून लोकांना तिचे आश्चर्य वाटू लागले.

मालिनीबाईंच्या नवऱ्याचा इंजेक्शन घेतल्यामुळे मृत्यू झाला की त्याने आत्महत्या केली, याची लोक चर्चा करू लागल्यावर मालिनीबाईंनी त्या प्रेताची विल्हेवाट लावली. मालिनीबाईंनी निवडणुकीचा फॉर्म

भरला. इनामदाराने स्वतःचा मळा, शेती, संपत्ती गेली तरी चालेल पण मालिनीबाईंना निवडून आणणार ही प्रतिज्ञा करतात.

मालिनीबाई प्रत्येक घरात जाऊन प्रचार करत होत्या. भूक लागली की त्या घरातील लोकाना म्हणायच्या, " जरा भाकर तुकडा दे की, की उपाशीच पाठवणार आहेस, तू तुझ्या लेकीला". त्यांनी दिलेली भाकरी मालिनीबाई कशी तरी खाऊन पुढील प्रचाराला जात. त्या प्रचार करत असताना दारिद्र्याने कळवंडून गेलेला मुलगा आडवा आला तर स्वतःच्या कपडयाची पर्वा करत नव्हत्या. मुलाला उचलून घेऊन त्याला पैसे दयायच्या व म्हणायच्या की, " याला चांगले कपडे घालायला व खायला दिले तर उदयाचा नागरिक खूप छान दिसेल". मालिनीबाईंनी लोकांना मोफत साडया दिल्या. मोफत दारु दिली. मालिनीबाईंनी कोण-कुणाचे नातेवाईक आहेत याची बारीक-सारीक माहिती मिळवली.

मालिनीबाई लोकांना जाहिरपणे आवाहन करत होत्या. माझ्याकडे इनामदाराकडे पहा, इनामदाराचा मुलगा माझा आहे. तो मोठा, सालस, भोळा-भाबडा आहे. इनामदार तुमचे शत्रू आहेत. त्यांच्याबरोबर भांडा. एका कोवळया निरापराध पोराला शिक्षा कशाला ? तुमच्यापैकी कोणीही तालुक्याला जाऊन रंगनाथच्या बायकोला विचारा तिने खरे आहे असे सांगितले तर तुम्ही द्याल ती शिक्षा भोगू, खोटे आहे म्हणाली तर तुम्ही आम्हाला मते दया. असे लोकांना सांगून त्या रडू लागल्या. मालिनीबाईंनी स्त्रियांचे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

एकूणच, मालिनीबाई, गावातील लोकांची कामे करत होत्या, त्यांनी स्वार्थ साधला नाही. त्यांनी दुसऱ्याच्यासाठी सर्व आयुष्य घालवले. मालिनीबाईंची सर्व तालुकाभर किर्ती पसरली आहे. सामाजिक कार्यकर्त्या म्हणून ही व्यक्तिरेखा लेखकाने रेखाटली आहे. एकंदरीत

या व्यक्तिरेखेमध्ये काही अंतर्विरोधही आहेत. एकीकडे सामाजिक कार्याचा प्रयत्न करणाऱ्या मालिनीबाई मतांसाठी लाच देतानाही दिसतात. राजकारणामध्ये कोणत्या स्वरूपाचे लोक आज वावरत आहेत आणि त्यांना पावलोपावली कोणत्या तडजोडी कराव्या लागत आहेत हे मालिनीबाईंच्या व्यक्तिरेखेवरून दिसून येते. आजच्या ग्रामीण राजकारणाचे स्वरूप वाचकांसमोर ठेवावे म्हणून मुद्दामच ही व्यक्तिरेखा लेखकाने निर्माण केली आहे.

## " गांधीरीचे डोळे " या कादंबरीतील समाजजीवनाचे चित्रण

समाज व्यवस्थेच्या बदलाची प्रक्रिया अत्यंत मंद गतीने होते. वर्षानुवर्षे चालत आलेल्या रूढी, परंपरेचा परिणाम समूह मनावर होत असतो. व्यक्तींना समाजपरिवर्तनाचे महत्त्व पटले की ते वैयक्तिक पातळीवर निर्णय घेतात. पण समाजाला ती बंडखोरी वाटते. समाजाने अशा व्यक्तींना बहिष्कृत केल्यावर त्यांचे जीवन अंधारमय होते. त्यातून ज्ञानेश्वरसुध्दा सुटले नाहीत. जातीभेदाविरोधी चळवळ उभी करून अनेक वर्षे झाली, पण यश आले नाही. चळवळीचे महत्त्व पटल्यामुळे सुशिक्षित तरूण-तरूणींनी वेगळ्या वाटेवरून प्रवास करण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण भागाची संस्कृती हीच महाराष्ट्राची संस्कृती आहे. अशाच एका खेड्यातील ग्रामीण जीवनामध्ये राजकीय निवडणुका, सामाजिक संघर्ष व ताणतणाव कसे घडून आले, याचे वर्णन या कादंबरीत चित्रित झालेले दिसून येते. अनेक प्रसंगातून या समाजजीवनाचे बिघडलेले अंतरंग दिसून येते.

एकदा गावातील एका माणसाने शाळेतील शिक्षकाला खूप मारले. आबासाहेब प्रतिष्ठीत माणूस म्हणून लोक त्यांच्याकडे न्याय मागायला गेले तेव्हा उलट ते शिक्षकाला म्हणाले, ' अशी प्रकरणे वाढू देऊ नयेत. गावच्या अब्रूचा प्रश्न असतो? नारायणाला वाटते की तक्रार

नोंदवली पाहिजे. गुन्हेगाराला शासन झाले पाहिजे. म्हणून त्याने मोर्चा काढला. आबासाहेब नारायणाला म्हणाले, "जाऊ दे नारायण, तो माणूसच बदमाश आहे. समाज आपल्या दहा हाताने चांगले करीत असतो. असा एखादा दुसरा असणारच."

आबासाहेब निवडणुकीला उभे राहणार होते म्हणून त्यांनी विरोधकाचे खच्चीकरण केले. संघटनेत काम करणाऱ्या मुलांची यादी केली. नि:स्वार्थी, निरलस कार्यकर्ता म्हणून स्वत:ची प्रतिमा निर्माण केली हे नारायणाला माहीत होते. म्हणून त्याचा आबासाहेबांना धाक वाटत होता. संघटनेने प्रश्न मांडला तर त्याची दखल कोणी घेत नव्हते म्हणून नारायणाने चमेलीला निवडणुकीला उभे केले.

नारायणाने चमेलीला वळण लागण्यासाठी शिकवले. पण लोक त्याची चर्चा करू लागले. नारायण कुसुमला म्हणाला, "तू,जे ऐकलस ते खरं आहे, तू गैरसमज करून घेऊ नको." चमेलीकडे लोक तुच्छतेने पहातात. यात काय दोष ? तो दोष निसर्गाचा आहे. निसर्गाच्या अपराधासाठी माणसाला काय म्हणून शिक्षा ! माणसांनी माणसांना सहानुभूतीने वागवायला काय हरकत आहे. इतकी तुच्छता, तिरस्कार काय म्हणून त्याच्या वाट्याला यावा....''[1] हे ऐकून कुसुम काहीच बोलत नाही.

निवडणुकीची गल्लीपासून दिल्लीपर्यंत चर्चा सुरू झाली. सत्ताधारी पक्ष अडी-नडीचे प्रश्न सोडवतो म्हणून लोकांचा ओढा या पक्षाकडे आहे. बामणीचे देशमुख तालुक्यात श्रीमंत आहेत. त्यांच्या शब्दाला मान देवून आबासाहेबांना तिकीट दिले जाते. विरोधी पक्षाच्या मंडळींना वाटत होते की अनिल कुंभार शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय आहे. त्याला तिकीट दिले तर तालुक्यातील तरूण मुले कामे करतील. पण अनिल कुंभार चांगला कार्यकर्ता असूनही त्याच्याजवळ पैसा नाही म्हणून त्याला

तिकीट दिले जात नाही. विरोधी पक्षाच्या मिटींगमध्ये हिरालाल पोरवालने गोविंदराव बोराडेंचे नाव उचलून धरले. बोराडे अस्थिर वृत्तीचे असल्यामुळे समन्वय समितीच्या अध्यक्षांना त्याचे नाव मान्य नसते. कित्येक तासाच्या बैठकीनंतर बोराडेंचे नाव अनपेक्षितपणे जाहीर होते. अनिल कुंभारची स्वप्ने धुळीला मिळतात. बोराडे लोकशाहीचे पावित्र्य, मतदानाचे श्रेष्ठत्व, सत्ताधारी पक्षाचा मस्तवालपणा, भ्रष्टाचार हे शब्द वक्तृत्वपूर्ण शैलीत उच्चारीत असले तरी त्याच्या हाडीमासी सत्ताधारी पक्षाची संस्कृती आहे. त्यामुळे अनिल कुंभारसारख्या कार्यकर्त्याला टाळून बोराडेंना तिकीट दिले हे नारायणाला पटले नाही.

रंगनाथची बायको प्रौढ आहे. रंगनाथ घराकडे लक्ष देत नसल्यामुळे ती मोलमजूरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. ती गवत आणायला इनामदाराच्या मळ्यात गेल्यावर इनामदाराच्या मुलाने तिच्यावर बलात्कार केला. त्यामुळे छप्पर नसलेल्या घरासारखे तिचे जीवन उघडे झाले. त्यादिवशी विविध तर्क करून समाजातील लोक चर्चा करु लागले. बायकोवर बलात्कार झाला ही बातमी रंगनाथला कळल्यावर त्याच्या हातापायातील बळच संपले. नारायणाला वाटते तिच्या मुलाने जाऊन इनामदाराच्या मुलाचा व साथीदाराचा कोथळा बाहेर काढायला पाहिजे होता.

रंगनाथच्या बायकोवर बलात्कार झाला, त्यादिवशी पोलीस अधिकारी, हॉस्पिटलमधील लेडीज ऑफिसर, व मेडिकल ऑफिसर जिल्हयाला गेले होते. म्हणून संघटनेच्या कार्यकर्त्यांनी उपोषणाचा विचार केला. उपोषणाच्या निर्णयामुळे तपासाची चक्रे फिरली आणि शेवटी पोलीसांनी रंगनाथच्या बायकोची जबानी घेतली. पोलीसांनी गुन्हेगाराला आठ दिवसात अटक करू अशी प्रतिज्ञा केली. झरीचे गोविंदराव बोराडे भाषणे देऊन आमदार व मुख्यमंत्री झाले.

चव्हाण, बोराडे स्वत:चे हितसंबंध राखून लोकांची कामे करत होते. बोराडेंच्या पाच-सात शाळेतील शिक्षकांना पगारही मिळत नव्हता. तसेच त्यांनी लोकांच्या जमिनीही बळकावल्या होत्या. बोराडेंचा बंगला म्हणजे भक्कम गढीच होती. अनिल कुंभारने नारायण ला सांगितले. " अरे, जिथं भरदिवसा गुन्हे करून लपवले जातात. तिथे काहीही घडू शकते...." हे ऐकून नारायण त्याला म्हणाला, " समोर घडते आहे हे दिसत असूनही समाजातील लोकांनी गांधारी-सारखी डोळयावर पट्टी का बांधली आहे ? "

एकदा रंगनाथची बायको नारायणाच्या घरी येऊन नारायणाचे पाय धरून त्याला म्हणाली, " अरं, कुठंच न्याय मिळत नाही. गरिबाला, मोठयांनी काय बी करायचे अन् निबवून न्यायचे हे पूर्वीपासूनचे चालले आहे. भाऊ, तू जिल्हयाला जाऊन उपयोग होणार नाही. एवढी बेअब्रू होऊनही स्त्री गप्प का बसते ? कुणी हिला लुळी -पांगळी व विकलांग केली ? हे प्रश्न नारायणाला भेडसावत राहतात.

रंगनाथची बायको आपली कर्मकहाणी सांगून गेल्यावर नारायणाचे वडिल त्याला म्हणाले, " बघितलंस ना नारायणा सर्व स्वप्नांचे खंत करणारे जीवन आहे, आपल्या सारख्यांच्या आयुष्याची माती झाली तरीही या लोकांना काही वाटत नाही. सर्व आयुष्य मी लोकांच्यासाठी खर्च केले. तरीही गरीब लोक अत्याचार सहन करून त्याच वाटेला गेली आहेत. "

निवडणुकीच्या धामधुमीमुळे लोकांमध्ये राजकीय जागृती निर्माण होईल असे नारायणाला वाटले. काही उमेदवाराने चमेलीसारख्या शिखंडीबरोबर लढावे लागणार म्हणून उमेदवारी मागे घेतली. काही उमेदवार निवडणुकीमुळे जनसंपर्क वाढतो, निधी जमा होतो म्हणून उभे राहिले होते. मालिनीबाईंना समाजकार्याची व राजकारणाची आवड आहे. गावातील कोणी आजारी असेल तर त्यांना हॉस्पिटल-मध्ये नेणे, अडल्या-नडलेल्यांना मदत करणे या प्रकारची कामे त्या

प्रामाणिकपणे करत होत्या. बाई खूप शिकलेली असूनही खेड्यात राहून काम करते हे पाहून लोकांना फार आश्चर्य वाटत असे.

गोविंदरावांचे वक्तृत्व चांगले आहे. त्यांनी फार्म भरल्यापासून जीप्स, पन्नास-शंभर मोटार सायकली प्रचार करायला फिरु लागल्या. सभेला पन्नास-साठ लोक असले तरी हजारोंचा जनसमुदाय आहे या थाटात ते भाषण करीत शिखंडीशी लढावे लागते म्हणून त्यांनी " राजाराम मोहन रॉय" ला दोषी ठरवलेले आहे. त्याने सतीची चाल बंद केली नसती तर मालिनीबाई उभ्या राहिल्या असल्या का ? त्यानंतर नारायणने लोकांना सांगितले, हिजड्यांनी उभं राहू नये, त्यांना मतदान करू नये, असं कुठं लिहिलेलं आहे का ? उभे राहिलेले उमेदवार हितसंबंध डोळ्यासमोर ठेवून काम करण्याचे नाटक करत होते. अशाप्रकारे नारायणचे बोलून झाल्यावर लोकांनी जयजयकाराच्या घोषणा दिल्या आणि चमेलीच्या प्रचाराचा नारळ फोडला.

संघटनेचे कार्यकर्ते सावळी गावात प्रचार करायला गेले. तिथे आबासाहेबांनी कार्यकर्त्यांचे स्वागत केले. त्यांनी गावातील हालचालीबद्दल नारायणला सांगितले. गावातील मुले आई वडिलांचे न ऐकता नारायणबरोबर प्रचार करायला आली. लोकांनी चमेलीला पाहून कपाळावर आठ्या घातल्या. कोण कलियुग अवतरले आहे असे म्हणून लागले. कार्यकर्त्यांनी ठरवले की कोणी काही म्हणाले तर त्याकडे लक्ष दयायचे नाही. काही लोकांच्या अंगात निवडणुकीची नशा, सत्ताधारी पक्षाचे रक्त सळसळत होते. आबासाहेबांचा प्रचार करणाऱ्या लोकांना पेट्रोल पंपावर पेट्रोल उधार दिले गेले नाही. या अपमानाचा बदला त्या लोकांनी नारायणवर घेतला.

एका उमेदवाराने स्वत:च रिक्शातून प्रचार करण्यास सुरुवात केली. तो उमेदवार स्वत:च भाषणामध्ये सांगत होता की तुमच्यासमोर विधानसभेचा गरीब, सज्जन नम्र, सालस, कामसू उमेदवार पंढरीनाथ काचूरे उभा आहे. तो शिक्षक, पत्रकार, वारकरी आहे. माझे चिंन्ह गरुड आहे. हे त्याचे बोलणे ऐकून कार्यकर्ते हसले. नारायण त्यांना म्हणाला

हसू नका तोही आपल्या सारखा एक वेडा आहे.

एकदा दिवस भर प्रचार करून कंटाळलेले कार्यकर्ते गाढ झोपले होते. चमेली अंथरूणावर नाही हे पाहून नारायण अस्वस्थ झाला. चमेली झोंकाड्या देत पायऱ्या कशा तरी चढत येत होता. नारायणने त्याला विचारले, " कुंठ शेण खायला गेला होतास" तर चमेली नारायणाला म्हणाला, " भाऊ, रागावू नकोस पूर्वी तालुक्याला आला की माझा एक जुना मित्र मला भेटल्याशिवाय जायचा नाही. त्याच्याकडे गेलो होतो, " काय करावं भाऊ लयी दिवस उपास घडला. किती दिवस उपाशी -हायचं.... जन्माची सवय जात नाही." नारायणाने चांगले वळण लागण्यासाठी त्याला शिकवले पण चमेली त्याच्याच वळणावर गेला.

एकेठिकाणी संघटनेच्या कार्यकर्त्यांना वेगळे चित्र पहायला मिळाले. ते म्हणजे आबासाहेबांच्या लोकांनी प्रचारच्या लावण्या लिहून दिल्या होत्या. त्या लावण्या तमाशातील लोक म्हणत होते. त्या ठिकाणी सर्व कार्यकर्ते गेले. नारायणाच्या मित्राने श्रीरंगाने भाषणामध्ये विरोधी पक्ष सत्तेसाठी का हपापलेला आहे, हिजडे कोण आहेत. या गोष्टी लोकांना जाहिरपणे सांगितल्या.

मालिनीबाई व इनामदाराने गोर-गरिबांना मोफत साड्या दिल्या, दारू दिली. गोविंदराव ही भ्रष्टाचार करू लागले. त्यामुळे लोकांचा त्यांच्यावरचा विश्वास उडाला. त्यामुळे गोविंदराव चिडखोर झाले. नारायणाने उघडलेल्या मोहिमेमुळे आबासाहेबांचा लोचटपणा, लाळघोटपणा, संधिसाधूपणा, त्यांनी जमवलेली मालमत्ता या गोष्टींचा उलगडा झाला. हे लोकांना माहिती झाल्यावर लोक त्यांची निंदा करु लागले.

मालिनीबाई लोकांना म्हणाल्या, " माझ्याकडे पहा, इनामदाराकडे, पहा, आम्ही असं काही करु शकू असं वाटतं का तुम्हाला ?.... इनामदाराचा मुलगा माझा आहे. इनामदार तुमचे शत्रू आहेत ना ? त्यांच्याबरोबर भांडा. निरापराध पोराला शिक्षा कशाला ? " तुमच्यापैकी कोणीही तालुक्याला जाऊन रंगनाथच्या बायकोला विचारा. तिने खरे आहे असं सांगितल तर तुम्ही म्हणाल ती आम्ही शिक्षा भोगू. खोटे आहे सांगितले तर तुम्ही आम्हांला मत दया. त्या भेदभाव मानत नव्हत्या. प्रत्येक घरात जाऊन प्रचार करत होत्या. मालिनीबाई कोणाकडूनही भाकरी मागून घेऊन खायच्या व पुढील प्रचाराला निघायच्या अशा परिस्थितीतही आबासाहेबांनी धीर सोडला नाही. बामीणींचे देशमुख इरेला पेटले होते. प्रत्येक गावातील गल्लीत प्रचार साहित्य पोहचले. सावकार, जमीनदार, उदयोगपती आपलाच घोडा श्रेष्ठ आहे म्हणून निवडणुकीत उतरले होते.

निवडणुकीचे चित्र पालटते. मतदान चार दिवसावर आले. सताधारी पक्षाच्या सरकारने वकिलाला कमकुवत भूमिका घ्यायला लावून इनामदाराच्या मुलाला सोडवून आणले. रंगनाथच्या बायकोने इनामदाराच्या मुलाला सोडवून आणायला काही तरी लिहून दिले. ही बातमी नारायणाला कळल्यावर तो पोलिओ झालेल्या माणसांसारखा विकलांग झाला. त्यामुळे त्याला सर्वत्र काळोखच दिसला. शेवटी या सर्व गोष्टींना कंटाळून नारायण निघून गेला.

गावाच्या वेशीत गेल्यावर त्याला इमानदाराच्या मुनिमाच्या मुलाची वरात दिसली. वरातीच्या पुढे इनामदाराचा मुलगा मोठया दिमाखाने चालत होता. नववधू कुसुम आहे हे पाहून त्याच्या हातापायातील बळ संपले. आई-वडील कार्यकर्ते या सर्वांना तोंड न दाखवताच जावे लागणार या कल्पनेने त्याला वाईट वाटते. नारायण खाली कोसळतो. आपले स्वत:चे परिवर्तन चमेलीमध्ये होत आहे असे त्याला वाटू लागते.

प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या व्यक्तींना नारायणने न्याय मागितला, परंतु त्यांनी न्याय दिला नाही म्हणून नारायणने मोर्चा काढला. चमेली बेहोष होऊन का पडला याचा विचार समाजातील लोक करत नाहीत. नारायणने चमेलीचा विचार केला. त्याच्या नावावर निवडणुकीचा फॉर्म भरला. त्याने एका हिजड्याला समाजात आणण्याचा प्रयत्न केला. नारायण सामाजिक कार्य करतो व न्याय मागतो परंतु त्याला समाज न्याय देत नाही. समाज रूढीपरंपरा, चालीरिती, संघर्ष, तणाव, राजकारण, निवडणुका, भ्रष्टाचार या गोष्टींमध्ये गुरफटला आहे असे दिसून येते.

नारायणने सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी स्वत:चे आयुष्य घालवेले परंतु कपट करूनही लोकांनी त्याला प्रतिसाद दिला नाही. शेवटी सर्व गोष्टींना कंटाळून त्याने पळ काढला. शेवटी आई-वडिलांना न भेटता, कोणालाही तोंड न दाखवता उद्या सकाळी जावे लागणार या भीतीने त्याच्या हातापायातील बळच संपते.

शेवटी भोवतालच्या विपरीत परिस्थितीचा नारायणाच्या मनावर परिणाम होतोच.

अशाप्रकारे आजकालच्या भ्रष्ट राजकीय व सामाजिक परिस्थितीचे फार चांगले चित्रण नागनाथ कोत्तापल्ले यांनी या कादंबरीत केले आहे. समकालीन राजकीय व सामाजिक वास्तवाचा एक वाङ्मयीन राजकीय दस्तऐवज म्हणूनच या कादंबरीकडे पाहिले पाहिजे.

## सारांश :

या कादंबरीमध्ये राजकारण त्यातले विविध धागे, गुंतागुंत याबरोबरच कौटुंबिक जीवन, खाजगी जीवन या गोष्टींचे चित्रण आलेले दिसून येते. सत्ताधारी पक्षातील आमदार, त्यांचे गट, डावपेच याचेही

चित्रण या कादंबरीत येते. राजकारणातील घटना अनेक पदरी व गुंतागुंतीच्या आहेत. राजकीय सत्तास्पर्धेत सहभागी झालेल्या लोकांच्या कौटुंबिक जीवनाचाही भाग या कादंबरीत आलेला आहे. राजकारणात सर्व उमेदवारांच्या ठिकाणी महत्वाकांक्षा असलेल्या दिसून येतात. आबासाहेब देशमुख, गोविंदराव बोराडे, मालिनीबाई पैठणकर हे सत्तास्पर्धेसाठी वाटेल ती तडजोड करीत असलेले दिसतात.

नारायणने आबासाहेबां सारख्या अनेक व्यक्तींच्या गोष्टी जनतेसमोर उघडकीस आणाल्या. त्यांचा पाठिंबा, राजकीय नेतृत्व, पक्षपात, वशिलेबाजी, भ्रष्टाचार या गोष्टी या कादंबरीतील राजकारणाच्या चित्रणामध्ये आल्या आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक सामाजिक राजकीय स्थित्यंतरे ग्रामीण भागातील समाजामध्ये घडून आली. समाजातील लोकांना सुधारण्यासाठी नारायणने कष्ट घेतले. परंतु त्याच्या कष्टाचे चीज झाले नाही. ज्यांच्यावर अन्याय झाला आहे, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी नारायणने खूप प्रयत्न केलेला दिसतो. गावातील लोकांनी नारायणाला पाठिंबा देऊन संघटना मोठी करायला पाहिजे होती. पण सर्व चक्र उलटे फिरले. सत्तास्पर्धेमुळे ग्रामीण भागातील लोकांमध्ये हेवेदावे निर्माण झाले.

नागनाथ कोत्तापल्ले यांनी जे अनुभवले पाहिले ते त्यांनी आपल्या कथा व कादंब-यातून लिहून लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्नकेला आहे. माणसाच्या समाजाशी असलेल्या अर्थपूर्ण नात्यातून नागनाथ कोत्तापल्ले यांची कादंबरी फुललेली दिसून येते. अज्ञान, दारिद्र्य, दु:खयामुळे पांगळ्या बनत चाललेल्या मानवी मनाचे खरेखुरे चित्रण या कादंबरीत दिसते. सामाजिक, राजकीय आर्थिक व धार्मिक या क्षेत्रातील दांभिकतेबद्दल असलेला विलक्षण संताप त्यांनी व्यक्त केलेला आहे. त्यांचा प्रवास मराठी कथा वाङ्मय व कादंबरी वाङ्मयाच्या दृष्टीने महत्वाचा ठरलेला आहे.

अशाप्रकारे समाजामध्ये घडणारे हेवेदावे, ताण-तणाव, सामाजिक स्थित्यंतरे, जातिभेद सामान्य माणसाला होणा-या दुःख-वेदना या गोष्टींचे चित्रण या कादंबरीत आहे.

स्वातंत्र्यप्राप्ती, नवीन राज्यघटना, विविध योजना यामुळेच खेडयातून राजकारणाला प्रेरणा मिळाली. राजकारणामुळे ग्रामीण भागातील समाजामध्ये संघर्ष, हेवेदावे घडून आलेले दिसतात. पक्ष बदल-णा-यांची स्वार्थी वृत्तीही वाढलेली दिसते. काही उमेदवार लोकांना पैसे देऊन मते घेतात. म्हणूनच काही लोकांना निवडणूक संपूच नये वाटत होते. निवडणुकीमुळे सर्वत्र भ्रष्टाचार माजतो. व सत्ता मिळवण्यासाठी स्पर्धा लागते. जीवनाची नवीन क्षेत्रे धुंडाळणा-या नागनाथ कोत्तापल्ले यांनी राजकीय जीवनावर ही कादंबरी लिहून सामान्य माणसांची मने जागृत करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

अशाप्रकारे नागनाथ कोत्तापल्ले यांनी " गांधीरीचे डोळे " या कादंबरीत राजकारणाचे हिडिस रूप व त्यातील सामाजिक जाणिवा तसेच उणिवा उघडकीस आणल्या आहेत.

अशाप्रकारे एक चांगली राजकीय कादंबरी म्हणून या कादंबरीचा उल्लेख करता येईल.

-xx-